7. (60) C|ATT|11|08|02

**शासकीय अधिकारी /कर्मचाऱ्यांची कार्यालयातील उपस्थिती तपासणीसाठी अचानक भेटी देणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
शासन परिपत्रक क्र.अहत-१६०८/प्र.क्र.४७/०८/११-अ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: १८ नोव्हेंबर, २००८

संदर्भ:- शासन परिपत्रक क्र.अहत-१६०८/प्र.क्र.४७/०८/११-अ, दिनांक ३ नोव्हेंबर, २००८

**शासन परिपत्रक :-**

शासकीय कर्मचाऱ्यांनी कार्यालयात वेळेवर उपस्थित रहावे. या संदर्भात यापूर्वी काही परिपत्रके शासन स्तरावर निर्गमित करण्यात आली आहेत. शासकीय कर्मचाऱ्यांची कार्यालयातील वेळेवरील उपस्थिती तपासण्यासाठी खात्रीलायक संगणकीय पध्दती निर्माण करण्याचा निर्णयही शासनाने घेतला असून संगणकीय प्रणाली प्रस्थापित करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. असे असले तरी त्यासंबंधी मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**उपरोक्त संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये जिल्हाधिकारी यांनी संबंधित जिल्हयातील शासकीय कार्यालयातील उपस्थिती तपासण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्हाधिकारी यांच्या अशा भेटींच्यावेळी श्री.अण्णा हजारे यांच्या संस्थेचा अथवा जिल्हयातील इतर सेवाभावी संस्थाच्या प्रतिनिधींना देखील उपस्थित राहण्याची अनुमती द्यावी असे मा.मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत मान्य झाले होते. त्यास अनुलक्षून शासकीय कार्यालयातील उपस्थितीची तपासणी करतेवेळी जिल्हाधिकारी यांच्या समवेत जिल्हाधिकारी यांचे प्रतिनिधी व श्री.अण्णा हजारे यांच्या संस्थेचा किंवा जिल्हयामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या इतर सेवाभावी संस्थेचा प्रतिनिधीचांही समावेश करण्यात यावा असा बदल करण्यात येत आहे. सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाच्या या सूचनांची नोंद घेवून योग्य कार्यवाही वेळोवेळी करावी असे सूचित करण्यात येत आहे.**

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २००८१११८११३८५६००१ असा आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
शाखा:-
आवक नं.:- 5898
8 DEC 2008
विशेष नोंद वही नं.:-
कार्य विवरण नं.:-
प्र. लि.

आदेशानुसार,

EST-V 15-12-08

(प्र.ल.पाठक)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
राज्यपालाचे प्रधान सचिव,
मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव
उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव / स्वीय सहायक,
अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र विधनसभा सचिवालय, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद सचिवालय, मुंबई
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
*सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी